**अत्यंत तातडीचे**

जा.क्र.शिउसं/प्राथ-४/समन्वय/पुवि/१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : 2 AUG 2010

(सदरचे परिपत्रक dydepune.com या Website वर upload केलेले आहे.)

प्रति,

शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर, सोलापूर
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, सोलापूर, अहमदनगर

विषय :INSPIRE PROGRAMME
IMPLIMENTATION OF INSPIRE AWARD COMPONENT TIMELY SUBMISSION OF PROPOSALS FOR THE YEAR 2010-2011

संदर्भ : मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे -३० यांचे पत्र जा.क्र.र २६२१ दिनांक ३०.७.२०१०

उपरोक्त विषयाचे आपणास लिहिलेले संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. व त्यानुसार कळविण्यांत येते की, INSPIRE 'of AWARD व्दारे प्रत्येक शासनामान्य शाळैतील इ. ६ वी ते १० वी मधील दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी एकवेळ एकरकमी रु. ५०००/- पारितोषित (अवॉर्ड) देण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांमधील प्रज्ञेय ( TALENT) प्रमाणपत्राच्या रुपाने अधिकृत मान्यता देण्यांत येणार आहे. INSPIRE AWARD योजनबाबतचा प्रस्ताव याच वर्षी सन २०१०-११ तातडीने सादर करुन त्यानुसार कार्यवाही करणे अनिवार्य अहे या योजनेत सर्व शासनमान्य जिल्हा परिषद, नगर परिषद, शासकीय खाजगी अनुदानित, विना अनुदानित, आश्रम शाळा तसेच केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या शाळा नवयोदय /केंद्रीय विद्यालये व अन्य बोर्डाच्या शाळा यांचा समावेश करावयाचा आहे.या प्रमाणे प्रत्येक शाळेतील इ. ६ वी ते ८ वी आणि इ. ९ वी ते १० वी प्रत्येक वर्गातून एका विद्यार्थ्यांच्या नावाची शिफारस करुन शिफारस केलेल्या विद्यर्थ्यांपैकी इ. ६ वी ते ८ वी या गटातून एक आणि इ. ९ वी ते १० वी या गटातून एक या प्रमाणे दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची या योजनेच्या लाभासाठी संबंधित शाळैच्या मुख्याध्यापकाने/ प्राचार्याने शिफारस करावयाची आहे. याबाबतचा प्रस्ताव विहित प्रपत्रात (सोबत नमूना संलग्न) जिल्हास्तरीय बैठक आयोजित करुन जिल्हयातील वरीलप्रमाणे सूचना नमूद केलेनुसार सर्व शाळांचे प्रस्ताव दिनांक १५.८.२०१० पूर्वी प्राप्त करुन घ्यावे.

जिल्हयातील सर्व उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे इयत्ता ६ वी ते १० वी विहित प्रपत्रातील प्रस्तावांचे जिल्हास्तरावर विहित प्रपत्रात संकलन करावे आणि जिल्हयाचा संकलित प्रस्ताव MS-EXCEL Format मधील सॉफ्ट कॉपी मा. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर नागपूर तथा Assistant State Nodal Officer यांचेकडे उशिरात उशिरा म्हणजे दिनाक ३१.८.२०१० पूर्वी सादर करावे. आपल्या जिल्हयाचा प्रस्ताव सादर करणेसाठी केंद्र शासनाने एक महिन्याचा कालावधी दिलेलो आहे याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. या योजनेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान प्रकल्प/ प्रतिकृती याचे तीन दिवसीय प्रदर्शन साधारणत नोव्हेंबर २०१० मध्ये स्वतंत्रपणे आयोजित करण्यांत यावे.

शिक्षणाधिकारी माध्यमिक हे योतनेकरिता डिस्टीक्ट नोडल ऑफिसर म्हणून काम पाहणार आहेत.

तरी वरीलप्रमाणे सूचना व सोबत जोडलेल्या परिपत्रकाचे अवलोकन करुन या योजनेसंबंधीची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन **आपल्या जिल्हयाचा संकलित प्रस्ताव (हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी MSEXCEL) दोन प्रतीत मा. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर नागपूर यांचेकडे दिनांक ३१.८.२०१० पूर्वी सादर करावा.**

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीसाठी सविनय सादर
मा. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर नागपूर

**अत्यंत तातडीचे**

पत्र क्र.मराशैसंप्रप/समन्वय १/INSPIRE AWARD/२०१०/ 2629
कार्यालय, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे - ३०
दिनांक :- दि. 30/6/2010

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), (प्राथमिक)
जिल्हा परिषद (सर्व)

----------------------------------

----------------------------------

शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई) (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**विषय :- INSPIRE PROGRAMME**
**IMPLIMENTATION OF INSPIRE AWARD COMPONENT Timely Submission of Proposals for the year २०१०-२०११**

संदर्भ :- १. भारत सरकार विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, तंत्रज्ञान भवन, न्यू मेहरोली रोड, न्यू दिल्ली-११० ०१६ यांचे पत्र दिनांक ६ जुलै, २०१०
२. परिषदेचे कार्यालयीन पत्र क्र. मराशैसंप्रप/समन्वय १/२०१०/२४६८, दिनांक १७.७.२०१०
३. या संस्थेचे पत्र क्र. . राविशिसं/भौतिक/ INSPIRE/६६६, दि. २५ जून, २०१०.
४. संदर्भ १ व २ नुसार टेक्नॉलॉजी भवन, नवी दिल्ली येथील बैठक दि. २१ जुलै, २०१०

उपरोक्त संदर्भान्वये, वरील विषयाच्या अनुषंगाने, आपणास **INSPIRE AWARD** योजना तातडीने कार्यान्वित करावयाची आहे. **INSPIRE AWARD** या योजनेचे स्वरुप व कार्यवाहीचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१) केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली यांचा INSPIRE (Innovation in science pursuit for Inspired Research) हा **इयत्ता ६ वी ते पदव्युत्तर पदवी** विद्यार्थ्यांकरिता शिक्षण व संशोधनासंबंधीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाच्या पाच घटकांपैकी INSPIRE Award हा प्रथम अंगभूत घटक आहे.

२) **INSPIRE Award** या योजनेद्वारे प्रत्येक शासनमान्य शाळेतील **इयत्ता ६ वी ते १० मधील दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी एकवेळ एकरकमी रु. ५०००/- पारितोषिक (Award) देण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांमधील प्रज्ञेस (Talent) प्रमाणपत्राच्या रुपाने अधिकृत मान्यता देण्यात येणार आहे.** विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच विज्ञान विषयायाच्या अभ्यासाची गोडी लागावी व विज्ञान विषयात पुढे संशोधन व विकासाच्या दृष्टीने त्याने आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्राप्त करुन घ्यावीत या उद्देशाने INSPIRE Award ही योजना अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-०८ ते २०११-१२) केंद्रशासनाने मंजूर केलेली असून सन २०११-१२

हे या योजनेचे शेवटचे वर्ष आहे. त्यामुळे INSPIRE Award योजनेबाबतचा प्रस्ताव याच वर्षी (सन २०१०-११) तातडीने सादर करुन त्यानुसार कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

३) या योजनेत सर्व शासनमान्य (जि.प., न.प., शासकीय, खाजगी अनुदानित, विना अनुदानित, आश्रम शाळा) तसेच केंद्रशासनाने मान्यता दिलेल्या शाळा नवोदय/केंद्रीय विद्यालये व अन्य बोर्डाच्या शाळा यांचा समावेश करावयाचा आहे.

४) **वरील ३ प्रमाणे,** प्रत्येक शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वी आणि इयत्ता ९ वी ते १० वी या प्रत्येक वर्गातून (Class) एका विद्यार्थ्यांच्या नावाची शिफारस करुन शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांपैकी **इयत्ता ६ वी ते ८ वी या गटातून एक** आणि **इयत्ता ९ वी ते १० वी या गटातून एक** याप्रमाणे दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची या योजनेच्या लाभासाठी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने/प्राचार्याने प्राधान्याने शिफारस करावयाची आहे. याबाबतचा प्रस्ताव विहीत प्रपत्रात (नमूना प्रत संलग्न) आपणाकडे सादर करणे आवश्यक असल्याने तशा सूचना परिपत्रक / प्रेस नोट प्रसिध्दी/ मुख्याध्यापकांची जिल्हास्तरीय बैठक याद्वारे तात्काळ देवून जिल्हयातील वरील क ३ प्रमाणे सर्व शाळांचे प्रस्ताव **१५ ऑगस्ट, २०१० पूर्वी** प्राप्त करुन घ्यावे. या योजनेचे प्रस्ताव सादर करताना INSPIRE Award साठी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग आणि मुली यांना **यथाशक्य प्रतिनिधीत्त्व** देण्यात आल्याची खात्री शाळाकडून प्रस्ताव घेताना आपण करुन घ्यावी.

५) आपल्या महाराष्ट्र राज्यात इयत्ता ६ वी आणि ७ वी चे वर्ग उच्च प्राथमिक शाळेत समाविष्ट असल्यामुळे या उच्च प्राथमिक शाळेतील दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याची विहीत प्रपत्रात शिफारस करण्याबाबत जिल्हयातील उच्च प्राथ. शाळेच्या मुख्याध्यापकांना तातडीने कळविण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचे मदतीने आवश्यक कार्यवाही करावी.

६) जिल्हयातील सर्व उच्च प्राथ. आणि माध्यमिक शाळांचे (इयत्ता ६ ते १०) विहीत प्रपत्रातील प्रस्तावांचे जिल्हास्तरावर विहीत प्रपत्रात संकलन करावे आणि जिल्हयाचा संकलित प्रस्ताव **MS-Excel format** मधील सॉफ्ट कॉपी संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर तथा **Astt. State Nodal Officer** यांचेकडे उशिरात उशिरा **३१ ऑगस्ट, २०१० पूर्वी** सादर करावे. आपल्या जिल्हयाचा प्रस्ताव सादर करण्यासाठी केंद्रशासनाने एक महिन्याचा कालावधी दिलेला आहे याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

७) या योजनेंतर्गत यावर्षी भारतातून २ लक्ष विद्यार्थ्यांना Award दिले जाणार असून प्रस्तावानुसार शिफारस केलेल्या प्रत्येक शाळेतील दोन विद्यार्थ्यांना प्रत्येकी एकदा एक रकमी रु. ५०००/- Award मिळणार असून त्या विद्यार्थ्यांस तो प्रज्ञावंत विद्यार्थी असल्याची ओळख प्रमाणपत्राद्वारे मिळणार आहे.

८) **या योजनेतील Award प्राप्त विद्यार्थ्यांने प्राप्त Award रु. ५०००/- पैकी ५०% रक्कम विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती (Science Project/Model) तयार करण्यासाठी खर्च करावयाची असून उर्वरित ५०% रक्कम जिल्हास्तरावरील प्रदर्शनामध्ये त्याच्या विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती सादर करण्यासाठी (प्रवासखर्च धरुन) खर्च करावयाची आहे.**

९) मुख्याध्यापकाने या योजनेकरिता त्यांच्या शाळातील ज्या दोन प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची शिफारस करावयाची आहे. ते दोन विद्यार्थी गुणवत्ताधारक व INSPIRE Award करिता पात्र असावेत. तसेच त्यांनी तयार केलेले विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती यांचे जिल्हास्तरीय प्रदर्शनात सादरीकरण करण्यात यावे.

१०) या योजनेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती यांचे तीन दिवसीय प्रदर्शन साधारणतः नोव्हेंबर, २०१० मध्ये स्वतंत्रपणे आयोजित करण्यात यावे. जिल्हास्तरीय प्रदर्शन आयोजनासाठी केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने २५० विद्यार्थ्यांसाठी रु. पाच लक्ष (विद्यार्थी संख्येनुसार प्रतिविद्यार्थी रु. दोन हजार या प्रमाणे कमाल रु. दहा लक्ष) एवढी तरतूद केलेली आहे. ही तरतूद प्राप्त करुन घेण्यासाठी वरील प्रमाणे शाळांचे संकलीत प्रस्ताव प्रदर्शन खर्चाच्या प्रस्तावासह विहीत मुदतीत स्टेट नोडल ऑफिसर यांचे कडे सादर करणे आवश्यक असल्याने व त्यांनी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाकडे सादर करणे आवश्यक असल्याने उपरोक्त प्रमाणे आपल्या जिल्हयाच्या संकलित प्रस्तावाच्या हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी (MS-Excel format) दोन प्रतीत सादर कराव्यात.

११) जिल्हास्तरीय प्रदर्शनाचा प्रस्ताव सादर करताना या योजनेतील प्रदर्शनात सहभागी होणारे Award धारक विद्यार्थी, त्यांच्या समवेत येणारे शिक्षक, परीक्षक यांची निवास व भोजन व्यवस्था, या योजनेची तसेच प्रदर्शन प्रसिध्दी व आयोजनासाठी येणारा इतर आनुषंगिक किरकोळ खर्च, तसेच राज्य शासनाच्या नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता, भोजन व निवास व्यवस्था, मानधन इत्यादी विचारात घेऊन या योजनेतील अवार्डी विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार जिल्हास्तरीय प्रदर्शनाचा प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करावा. (जिल्हास्तरीय प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या अवार्डी विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च त्यांना मिळणारे अवार्ड रु. ५०००/- यामध्ये समाविष्ट आहे.)

१२) जिल्हास्तरीय प्रदर्शनात अवार्डी विद्यार्थ्यांनी मांडणी केलेल्या विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती यांचे मूल्यमापन तीन परीक्षकाच्या पथकाने करण्यात यावे. (विज्ञान महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे प्राध्यापक असावेत व एक परीक्षक राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांचे मान्यतेने घेण्यात यावा.) तीन परीक्षकांच्या पथकाने मूल्यमापन केलेल्या परीक्षणातून विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती पैकी **उत्कृष्ट ठरलेले ५% प्रकल्प/प्रतिकृती यांची राज्यस्तरावरील प्रदर्शनाकरिता निवड करण्यात यावी.**

१३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक हे योजनेकरिता **डिस्ट्रीक्ट नोडल ऑफिसर** म्हणून काम पाहणार आहेत. जिल्हास्तरीय प्रदर्शनाकरिता विज्ञान तंत्रज्ञान विभागाकडून मिळणारा निधींचा निकषाप्रमाणे विनियोग करणे यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत आपले नावे खाते उघडण्यात यावे. आणि आपल्या बँक खात्यासंबंधीची आवश्यक माहिती जसे बँकेचे नाव, शाखा, पत्ता, खात्याचा प्रकार, खाते क्रमांक, संबंधीत बँक शाखा यांचा IFSC Code, MICR Code इ. माहिती स्टेट नोडल ऑफिसर/असिस्टंट स्टेट नोडल ऑफिसर यांचेकडे सादर करावी. डिस्ट्रिक्ट नोडल ऑफिसर म्हणून आपण प्रदर्शनावरील झालेल्या खर्चाचे योग्य अभिलेखे ठेवावी. तसेच प्रदर्शन आयोजित झाल्यानंतर तातडीने आवश्यक उपयोगिता प्रमाणपत्र स्टेट नोडल ऑफिसर यांचे मार्फत विज्ञान व तंत्रज्ञान विभागास सादर करणे आवश्यक आहे. प्रदर्शन आयोजनासाठी आपल्या प्रस्तावानुसार आवश्यक निधी अग्रीमाच्या स्वरुपात विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून **(स्टेट नोडल ऑफिसर यांचे मार्फत)** मिळणार आहे.

१४) राज्यस्तरीय प्रदर्शनाचे आयोजन डिसेंबर, २०१० मध्ये करण्याचे अपेक्षित असून यासाठी आपल्या जिल्हयातील जिल्हास्तरीय प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या ५% प्रकल्प/प्रतिकृती यांना सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. राज्यस्तरीय प्रदर्शनातून परीक्षणातून सर्वोत्कृष्ट ठरलेल्या **पाच प्रकल्प/प्रतिकृती** यांना राष्ट्रीयस्तरावरील प्रदर्शनात सहभाग घेण्याची संधी मिळेल.

१५) या योजनेसाठी प्रत्येक शाळेने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे निवड केलेल्या विद्यार्थ्यांना अवार्डची रक्कम (अवार्ड वारंटस) स्टेट नोडल ऑफिसर मार्फत आपणास/शाळांना पाठविण्यात येईल. बँकेतून पारितोषिकाची रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यांस बँकेचे खाते काढण्याची गरज नाही.

१६) आपणास पुनश्च सूचित करण्यात येते की, या योजनेत सर्वच प्रकारच्या, सर्व व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त शाळांचा समावेश करण्यात यावा.

१७) या योजनेच्या तात्काळ कार्यान्वयनासाठी सोबत जोडलेल्या प्रेसनोट ला जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी द्यावी.

तरी, उपरोक्त प्रमाणे या योजनेसंबंधीची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन आपल्या जिल्हयाचा संकलित प्रस्ताव **(हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी MS-Excel format)** दोन प्रतीत संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांचे कडे उशिरात उशिरा **दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० पूर्वी** सादर करावा.

**संचालक**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०.

**प्रत - माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर
२. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) पुणे
३. शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद (सर्व)

Government of India
Ministry of Science & Technology
Department of Science & Technology

....

**Subject : INSPIRE Award Scheme – General Guidelines / Clarifications.**

1. Innovation in Science Pursuit for Inspired Research (INSPIRE) is a flagship programme of this Ministry / Department which has five components covering entire range of education and research from class 6$^{th}$ to post graduate stage of a student. The first component of this programme is the "INSPIRE Award" which recognizes the talent among students at a very early stage.

2. Under the scheme, a one time award of Rs. 5000/- is given to the students, who would utilize about 50% of the amount for making a science project / model and balance 50% towards cost of bringing project / model at District Level Exhibition Centre for display.

3. The scheme envisages selection of 1 million (10 lakh) students during the 11$^{th}$ Five Year Plan (2007-08 to 2011-12), @ 2 lakh awards per year. Considering that there are about 5 lakh schools in the country which would have classes 6th to 10th, during the 5 years period, 2 students from each school would be selected for the INSPIRE Award (in two phases).

4. The selection of the students, on merits, is to be done by the Principal. No specific criteria / guidelines have been laid down by DST in this regard and it is expected that Principals / Headmasters / Headmistresses would be nominating the most deserving and meritorious students for such awards. However, a wide publicity should be done in the school about this scheme so that students become aware of it. Posters / pamphlets containing brief details of the scheme should be put on notice board / other prominent places in the school.

5. The proposal from each school has to come in the prescribed format (copy enclosed). From each school, name of the recommended student in each class (from 6th to 10th) has to be indicated along with the name of the preferred child in each Group (Group A consisting of classes 6$^{th}$ to 8$^{th}$ and Group B consisting of classes 9$^{th}$ to 10$^{th}$). To the extent possible, equal representation should be given to the students from each class. It should be ensured that relevant details in various columns of the format are properly filled in respect of all the students / schools (like sex of the student in col. 11, category in col. 12, type of school in col. 6, location type in col. 7 and so on).

Based on these details, DST would select 2 children from each school (1 in the first phase and 1 in the second phase over the Five Year Plan period) and convey the decision to the concerned authorities and send the award warrants in the name of selected students to the State Nodal Officer.

6. The proposals of all schools within a district has to be compiled in the enclosed format by District Education authorities and sent to State authorities **(along with soft copy in MS-Excel format),** who would compile the proposals for the entire State and send to DST **(along with soft copy in MS-Excel format).** (One single file for entire state or separate files for different districts of the state can be prepared).

7. The states who could not participate in the said scheme / could not send any proposal till the end of financial year 2009-10, are requested to send proposals for 2010-11 and 2011-12 together. For middle schools i.e. those having classes 6th to 8th only, 1 set of proposal would be given for the year 2010-11 and another set of proposal for the year 2011-12. For High / Higher Secondary Schools i.e. schools having classes 6th to 10th, two names would be recommended from classes 6th to 10th (1 from Group A, i.e. classes 6th to 8th and 1 from Group B, i.e. classes 9th to 10th). Out of these, 1 name would be selected during the year 2010-11 and the second name during the year 2011-12. However, if sufficient funds are available, DST can even sanction the 2nd child during this financial year itself from the list of 2011-12 for middle schools and / or from list of High / Higher secondary schools for those states who send complete proposals in time. It may be noted that 2011-12 being the last year of 11th Five Year Plan, it is essential that proposals from States / UTs, covering two students from ALL the Schools, as stated in this para, must be submitted during 2010-11 itself.

8 (a) Simultaneously, the states should give programme / schedule of their District level and State level exhibitions and proposals for funds for organizing such exhibitions. Funds would be released to the States / UTs to meet cost of boarding and lodging of awardees, teachers accompanying them, members of Jury, etc. and travel cost of accompanying teacher, Jury members, honorarium to Jury members, etc., publicity, other miscellaneous costs towards organizing the exhibitions. TA/DA, boarding, lodging, honorarium etc. would be paid as per entitlements under the State Government rules. For States exhibition, in addition to items mentioned above, the expenditure would also include travel cost of selected students. (Travel cost of students for District level exhibition is included in the Rs. 5000/- award money).

(b) Funds would be released based on proposals received from State Government for District level / State level exhibitions, giving broad details of proposed expenditure, subject to a ceiling of Rs. 20.00 lakhs for State level exhibition and Rs. 5.00 lakhs for District level exhibition having participation of about 250 students. For District level exhibitions having lesser / more number of students, funds would be decreased / increased on pro-rata basis (subject to a maximum limit of Rs. 10.00 lakhs per District level exhibition). In cases, where the number of students for District level exhibition is very small, there is no objection in organizing combine exhibition for 2 to 3 neighbouring District at one location. Funds would be released as an advance on submission of programme / schedule of Exhibition with projected cost by the State / UTs. Thereafter, the States / UTs would be required to submit Utilization Certificates in the prescribed format to the Department of Science & Technology, Government of India within 45 days of organization of District / State level exhibition.

(c) The State Nodal Officer / other authorized officer of the State Government, dealing with the INSPIRE Scheme would be required to open a Bank Account specifically for the purpose of receiving funds from DST for District and State level exhibitions and intimate the details of the Bank account so opened viz. name of the Bank, Branch address, type of account, Bank account number, IFSC Code of the Bank / Branch, MICR Code of the Bank / Branch, etc. These particulars will help in immediate transfer of funds from the Bank account of DST to the bank account of State Nodal Officer (INSPIRE) through various Electronic Funds Transfer modes. Hence, while submitting the proposals for release of funds, simultaneously, the State / UT must furnish the bank details for enabling immediate transfer of funds. Similar arrangements should be put in place asking District Nodal Officers of all the Districts to open a bank account exclusively for receiving funds for District level exhibitions, so that State Nodal Officer, immediately on receipt of funds from DST, can transfer the same electronically to the bank accounts of respective District level Nodal Officers. State Nodal Officer and District Nodal Officer would maintain proper records of funds received, spent, balance, etc. and submit requisite Utilization Certificates to DST through State Nodal Officer.

9.(a) All awardees get an opportunities to display their project at the District Level Exhibition to be organized by District Level Authorities. Projects at District Level would be judged by a 3-member jury (2 locals- to be appointed by District / State authorities (from local college/ university / other reputed institutes faculty members) and 1 DST panel – INSPIRE Mentor list available

at DST website), who would select best projects / models, subject to maximum of 5% project / models for State level Exhibition.

(b) Selected projects at District level would get opportunity to participate in the State Level Exhibition, to be organized by State authorities. Projects at State level would be judged by a 3-member jury (2 locals- to be appointed by District. / State authorities and 1 DST panel – INSPIRE Mentor list available at DST website) who would select best 5 projects / models for National level.

(c) Selected projects at State / UT level would get opportunity to participate in the National Level Exhibition, to be organized by DST Projects at National Level would be judged by jury appointed by DST, who would select best 5 projects.

10. For those States/UTs who had sent proposals during the year 2009-10 and had got awards in respect of some schools, it should be ensured that for the current year,

(a) Separate proposal are sent for the remaining schools of the State/UT as indicated in para 7 above i.e. for two students.

(b) For those schools, to which one award has been sanctioned upto 2009-10, separate proposals should be sent for the second award.

(c) **No school should be included in the list if it has already been** sanctioned two awards upto 2009-10.

11. Keeping in view the large number of schools and the students recommended from each school in each class, proposals can be processed by DST only if accompanied by Soft Copy (in MS Excel format in prescribed proforma duly filled in). **In the absence of Soft Copy, it will not be possible for Department of Science & Technology to process proposals and sanction the awards**. Hence, to avoid any delay, states are requested to ensure that Hard Copy of the proposals is simultaneously accompanied by soft copy which can be sent either on CD or through e-mail of concerned officers of DST.

12. All the INSPIRE awardees would get a Certificate. In addition, Certificates would be given to the students whose projects / models are selected / adjudged best at the District / State / National Level Exhibition.

13. The award amount would be sanctioned in the name of selected students and award warrants in the name of selected students would be got prepared from the bank. All the award warrants of a particular State / UT would be handed over to State Nodal Officer / his representative for onward distribution to awardees through District / School authorities. As per the understandings with DST's bank issuing the award warrants, it is not compulsory for the awardees to open a bank account to en-cash his warrant. The Award / Warrant can be en-cashed at any branch of the bank (State Bank of India) at par.

14. It may be noted that all types of recognized schools, whether Government (Central Government / State Government) or Private (Aided or Unaided), or run by NGOs etc. are covered under the scheme.

15. While sending the proposals, it should be ensured that adequate number of students are included from SCs, STs and OBC categories and maximum possible representation is given to girl students in proposals from co-educational schools.

*****

---

*Notes: e-mail of officers for sending soft copy of proposal.*

*Shri N.J. Thomas, Deputy Secretary, e-mail: nj.thomas@nic.in*
*Shri Rajiv Malik, Under Secretary, e-mail: us.inspire-dst@nic.in*
*Shri Devendra Singh, Scientist 'E', e-mail: ds.chahar@nic.in*

Format (Revised)

# INSPIRE Award Proposals

## Name of the State :

| Sr. No. | District | Sub District(Block/ Tahsil/Zone etc.) | Name of the School | No of children selected from the school till 2009-10 | Type Of School*(see Note below) | Location Type (R/SU/U) | Group | Class | Name of the recommended Student in each Class | Sex (M/F) | Category (G/SC/ST/OBC) | Father/ Mother Name | Preferred Child Name(one Name from each Category of each School) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | School 1 | | | | A [Class 6th | 6th<br>7th<br>8th | | | | | |
| | | | | | | | B [Class 9th - | 9th<br>10th | | | | | |
| | | | School 2 | | | | A [Class 6th | 6th<br>7th<br>8th | | | | | |
| | | | | | | | B [Class 9th - | 9th<br>10th | | | | | |
| | | | School 3 | | | | A [Class 6th | 6th<br>7th<br>8th | | | | | |
| | | | | | | | B [Class 9th - | 9th<br>10th | | | | | |

Note: Depending upon the school structure available in each state, one may have suitable combination of Classes within Category.

SIGNATURES of THE AUTHORISED SIGNATOR

NAME:

DESIGNATION (with office Seal):

Contact Numbers

E:mail

**Note / Abbreviations:**

SG -State Government
PA- Private Aided ( SG )
PUA- Private Unaided ( SG )
O_SG- Others ( SG )
KV -Kendriya Vidyalaya (Central School)
NV- Navodaya Vidyalaya (Central Government)
SS -Sainik School (Central Government)
O_CG -Others (Central Government)

R- Rural
SU- Semi -Urban
U- Urban
M -Male
F -Female
G -General
SC -Scheduled Caste
ST -Scheduled Tribe
OBC -Other Backward Class

# प्रेस नोट

केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालया अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली यांचा INSPIRE (Innovation in Science pursuit for Inspired Research) हा **इयत्ता ६ वी ते पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षण व संशोधनासंबंधी चा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे.**

**या कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना शालेयस्तरा पासूनच विज्ञान विषयाच्या अभ्यासाकडे आकर्षित करणे आणि विज्ञान व तंत्रज्ञान यामधील संशोधन व विकास यासाठी त्यांना सक्षम करणे असा आहे.** INSPIRE या कार्यक्रमाचे पाच अंगभूत भाग असून यापैकी INSPIRE Award हा पहिला अंगभूत भाग आहे. **INSPIRE Award ही योजना प्रत्येक शाळेतील इयत्ता ६ ते १० मधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांशी निगडीत आहे. या योजनेद्वारे शालेयस्तर पूर्ण होण्यापूर्वी विद्यार्थ्यांमधील प्रज्ञेस (Talent) अधिकृत मान्यता/ओळख देण्यात येते.** INSPIRE Award या योजनेत दरवर्षी २ लक्ष विद्यार्थ्यांना प्रत्येकी एकदा एक रकमी रु. ५०००/- Award प्रमाणपत्रासह देण्याची केंद्रशासनाने तरतूद केलेली आहे. या योजनेकरिता प्रत्येक शाळेतील २ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना INSPIRE Award देण्यात येणार असून यासाठी **शाळेच्या मुख्याध्यापकानी इयत्ता ६ वी ते १० वी मधील २ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेच्या निकषावर करावयाची आहे.** यासाठी वेगळे निकष विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने निश्चित केलेले नाहीत.

प्रत्येक शाळेने **इयत्ता ६ ते ८** मधील प्रत्येकी एक विद्यार्थी याप्रमाणे तीन विद्यार्थ्यांपैकी **एका विद्यार्थ्याची** तसेच **इयत्ता ९ वी, १० वी** मधील प्रत्येकी एक याप्रमाणे दोन विद्यार्थ्यांपैकी **एका विद्यार्थ्याची** म्हणजेच प्रत्येक शाळेतून दोन विद्यार्थ्यांची INSPIRE Award साठी शिफारस करावयाची असून याबाबतचा **प्रस्ताव विहीत प्रपत्रामध्ये** जिल्हास्तरावर सादर करावयाचा आहे. या योजनेत इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंत वर्ग असणाऱ्या प्रत्येक शासनमान्य माध्यमिक शाळांचा (सर्व व्यवस्थापनाच्या/माध्यमाच्या/अनुदानित/विना अनुदानित) आणि इयत्ता ६ वी व ७ वी च वर्ग असणाऱ्या उच्च प्राथमिक शाळांचा समावेश आहे. प्रत्येक शासनमान्य शाळेने विहीत प्रपत्रातील प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांचे कडे **दिनांक १५ ऑगस्ट, २०१० पूर्वी** सादर करावयाचा आहे. विहीत प्रपत्र शिक्षणधिकारी माध्यमिक यांचेकडून प्रत्येक शाळेस उपलब्ध होणार आहे.

या योजनेत विद्यार्थ्यांस एकवेळ एकरकमी रु. ५०००/- चे पारितोषिक (Award) मिळणार असून यापैकी ५०% रक्कम विज्ञान प्रकल्प/विज्ञान प्रतिकृती तयार करण्यासाठी आणि उर्वरित ५०% रक्कम जिल्हास्तरीय प्रदर्शनात आपली प्रदर्शनीय वस्तू (विज्ञान प्रकल्प/प्रतिकृती) मांडण्यासाठी वापरावयाची आहे. यामध्ये त्याचा प्रवासाचा खर्च समाविष्ट आहे. या योजनेसाठी प्रत्येक शाळेने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे निवड केलेल्या विद्यार्थ्यांना अवार्डची रक्कम (अवार्ड वारंटस) स्टेट नोडल ऑफिसर मार्फत शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शाळांना पाठविण्यात येईल. बँकेतून पारितोषिकाची रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यांस बँकेचे खाते काढण्याची गरज नाही. आवश्यक माहितीसाठी संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक यांनी आपल्या जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा **District Nodal Officer** यांचेशी संपर्क साधावा. अधिकच्या माहितीकरिता संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर तथा **Astt. State Nodal Officer** यांचेशी संपर्क साधावा. **(०७१२/२५६२९८९)**

**संचालक**
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०.